बुधवार दि. १२ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३४२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## भाजपा जिल्हा कार्यालय नवीन इमारतीच्या भूमिपूजन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा - रावसाहेब दानवे

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी, जालना जिल्हा कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस व भाजपा प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण हे जालना शहरात येत आहेत. हा भूमिपूजन सोहळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते होणार असून भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रवींद्र चव्हाण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. हा कार्यक्रम ऐतिहासिक करण्यासाठी जालना महानगर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी या सोहळ्यास हजारोच्या संख्येने उपस्थित राहवे असे आवाहन आज भाजपा जिल्हा कार्यालयात झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीमध्ये माजी मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले. यावेळी भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे, माजी आ.कैलास गोरंटयाल, महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, अशोक पांगारकर, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर पाटील भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, सतीश जाधव, युवानेते अक्षय भैया गोरंटयाल, नगरसेवक महावीर ढक्का, बाबू मामा पवार, शिवाजी शेजूळ, धनराज काबलिये, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, अमोल कारंजेकर, अरुणा जाधव, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, महेश निकम, अमोल



धानुरे, संजय डोंगरे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष शुभांगीताई देशपांडे इत्यादींची उपस्थिती होती. यावेळी रावसाहेब पाटील दानवे म्हणाले कि, भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र मध्ये प्रत्येक जिल्हा स्तरावर भारतीय जनता पार्टी चे भव्य दिव्य असे कार्यालय निर्माण करण्याचा निर्णय केलेला आहे. त्या अंतर्गत जालना येथे एक भव्य दिव्य असे भारतीय जनता पार्टी चे नवीन इमारत होणार असून, यावेळी या ऐतिहासिक सोहळ्याचा भूमिपूजन सोहळा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते होत असून, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याच्या यशस्वी प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्रजी चव्हाण हे राहणार आहे. तरी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी आपण हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून हा कार्यक्रम यशस्वी करावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी आ.नारायणभाऊ कुचे यांनी सांगितले की, या उदघाटन सोहळा कार्यक्रमासाठी महानगरातील प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपल्या प्रभागामध्ये नागरिकांमध्ये पोहचवून जाहिरात करावी व आपल्यान (पान २ वर)

भारत माता की जय, वंदे मातरम, जय जवान जय किसानच्या घोषणांनी मंठा शहर दुमदुमले

## ‘देशहित प्रथम’ची भावना कृतीत आणा; विद्यार्थी हे विकसित भारताचे भविष्यातील शिल्पकार - आ. बबनराव लोणीकर

**मंठा - प्रतिनिधी**

भारताच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर मंठा शहरात आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वाखाली भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, तब्बल १२ हजारांहून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनी, युवक-युवती, महिला, विविध क्षेत्रातील व्यावसायिक, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी आणि नागरिकांनी हातात तिरंगा घेऊन सहभाग नोंदविला. शहरातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या या



रॅलीमुळे संपूर्ण मंठा शहर अक्षरशः तिरंगामय झाले होते. रॅलीदरम्यान ‘भारत माता की जय’, ‘वंदे मातरम्’, ‘जय जवान जय किसान’, ‘जय भवानी जय शिवाजी’, ‘छत्रपती शिवाजी महाराज की जय’, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो’ अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांसह विविध समाजघटकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतल्याने रॅलीला उत्स्फूर्त आणि व्यापक स्वरूप प्राप्त झाले.

**विद्यार्थ्यांची भूमिका राष्ट्रनिर्मितीत निर्णायक**

या रॅलीच्या निमित्ताने बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी विद्यार्थी हे विकसित भारताचे भविष्यातील शिल्पकार असून (पान २ वर)

## निवासी सदनिका भाड्याने देणे हा व्यावसायिक उद्देश नाही, सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**जालना - प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण निकालात स्पष्ट केले आहे की, निवासी सदनिका (फ्लॅट) खरेदी करून ती भाड्याने देणे हा व्यावसायिक उद्देश ठरत नाही आणि त्यामुळे घरमालकाचा ग्राहक म्हणून असलेला दर्जा हिरावून घेतला जाऊ शकत नाही. विनीत बहारी आणि इतर विरुद्ध मेसर्स एमजीएफ डेव्हलपर्स लिमिटेड आणि इतर या प्रकरणात (सिव्हिल अपील क्र. ६५८८/२०२३) सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाचा निर्णय रद्दबातल ठरवला. या निकालामुळे घर खरेदी करणाऱ्या सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे, अशी प्रतिक्रिया नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी व्यक्त केली आहे.

या प्रकरणात, तक्रारदारांनी गुडगाव येथे एक फ्लॅट बुक केला होता, ज्याचा ताबा मिळण्यास विलंब झाला. विकासकाने इतर अनेक त्रुटी ठेवल्याने त्यांनी राष्ट्रीय ग्राहक आयोगाकडे तक्रार दाखल केली. मात्र, विकासकाने असा युक्तिवाद केला की तक्रारदारांनी फ्लॅट भाड्याने दिला असल्याने तो व्यावसायिक कारणांसाठी वापरला जात आहे, त्यामुळे ते ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ च्या कलम २(१)(डी) नुसार ग्राहक नाहीत. राष्ट्रीय आयोगाने विकासकाचा हा युक्तिवाद मान्य करून तक्रार फेटाळली होती. सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय चुकीचा ठरवत प्रकरण पुन्हा राष्ट्रीय आयोगाकडे गुणवत्तेवर सुनावणीसाठी पाठवले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात मुख्य हेतूची कसोटी या तत्त्वावर भर दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, एखादी व्यक्ती ग्राहक आहे की नाही हे ठरवण्यासाठी मालमत्ता खरेदीमागील मुख्य हेतू काय होता हे तपासणे आवश्यक आहे. केवळ मालमत्ता भाड्याने दिल्याने खरेदीचा हेतू व्यावसायिक होता, असे आपोआप सिद्ध होत नाही. मालमत्ता व्यावसायिक कारणांसाठी खरेदी केली होती हे सिद्ध करण्याची जबाबदारी विकासकावर (सेवा पुरवठादारावर) आहे, तक्रारदारावर नाही. या प्रकरणात, विकासक हे सिद्ध करण्यात (पान २ वर)

## ‘ग्रंथ हेच खरे गुरु, ज्ञान हाच जीवनाचा आधार’; गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांची ग्रंथालयाला भेट





**जालना - प्रतिनिधी**

गुरुपौर्णिमेनिमित्त संस्कार प्रबोधिनी विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षकांनी नागसेन ग्रंथालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील पुस्तके, संदर्भग्रंथ, चरित्रे तसेच दैनिक वृत्तपत्रांचे वाचन करून वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला. नागसेन ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष राजेश राऊत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ‘‘ग्रंथ हेच खरे गुरु असून, वाचन हीच यशाची गुरुकिल्ली आहे. नियमित वाचनामुळे ज्ञान, विचारशक्ती आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो,’’ असे सांगितले. आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या वापरावर नियंत्रण ठेवून पुस्तकांशी मैत्री करावी आणि दररोज वाचनाची सवय लावावी, असे आवाहन त्यांनी केले. स्पर्धा परीक्षा तसेच विविध क्षेत्रांत यश मिळविण्यासाठी इतिहास, विज्ञान, भूगोल, संविधान, साहित्य आणि चालू घडामोडींचे व्यापक ज्ञान आवश्यक असल्याचे राऊत यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकांसोबत अवांतर वाचनावरही भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांना नागसेन ग्रंथालयातील ग्रंथसंपदा, वाचनगृह, अभ्यासिका, सदस्यत्व प्रक्रिया तसेच उपलब्ध सुविधांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आवडीची पुस्तके वाचत ग्रंथालयातील वातावरणाचा अनुभव घेतला.

या कार्यक्रमास संस्कार प्रबोधिनी विद्यालयाचे भागवत मराठे, सीमा आरडे, सुवर्णा पाठक, सोनाली परभनकर आणि प्रशांत बोधक यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. नागसेन ग्रंथालयाच्या सचिव संगीता राजेश राऊत, ग्रंथपाल पवन लाड यांच्यासह ग्रंथालय कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी राऊत यांनी विद्यार्थ्यांनी नियमित वाचन करून ज्ञानसंपन्न, सुसंस्कृत व जबाबदार नागरिक बनण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले.

समाजाच्या सामाजिक परिवर्तनासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज

## पारध’ प्रकल्पांतर्गत अंधश्रद्धा निर्मूलन, बालहक्क, बालविवाह, बालकामगार व POCSO कायद्याबाबत जनजागृती

**परतूर - प्रतिनिधी**

पारधी समाजातील नागरिकांना अंधश्रद्धा, रूढी-परंपरा आणि गैरसमजांपासून दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासोबतच शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, बालहक्क आणि कायदेशीर हक्कांबाबत जागृती निर्माण करण्यासाठी क्रांती संस्था, पुणे आणि अंधश्रद्धा निर्मूलन समिती, जालना यांच्या पुढाकाराने जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.



पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील आंबे येथील क्रांती संस्था मागील अनेक वर्षांपासून भटक्या, विमुक्त, अर्धभटके जमाती तसेच आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. संस्थेच्या माध्यमातून ‘पारध (PARADH)’ हा विशेष प्रकल्प जालना जिल्ह्यातील परतूर तसेच धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथे राबविण्यात येत आहे.

या प्रकल्पाच्या माध्यमातून पारधी समाजातील नागरिकांना आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, शासकीय योजनांचा लाभ, आवश्यक कागदपत्रे, डिजिटल साक्षरता, कौशल्यविकास आणि सामाजिक हक्क याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणून त्यांचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे.

याच उपक्रमाचा एक भाग म्हणून ६ ऑगस्ट २०२६ रोजी परतूर येथील जुना पारधीवाडा, बिरसा मुंडा नगर तसेच पारधी पुनर्वसन परिसरात अंधश्रद्धा व सामाजिक प्रश्नांवर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी समाजातील नागरिकांशी (पान २ वर)

## संत गजानन महाराज पालखी सोहळ्यात ४३६ भाविकांची निशुल्क मधुमेह तपासणी

१६ जण मधुमेही तर ४६ जण प्री-डायबेटिक असल्याचे निदान-डॉ. राजेश सेठिया

**जालना - प्रतिनिधी**

पंढरपूर येथून परतीच्या मार्गावर असलेल्या श्रीक्षेत्र शेगाव येथील संत गजानन महाराजांच्या जेईएस महाविद्यालयात मुक्कामी पालखी सोहळ्यात सोमवार दि. १० ऑगस्ट रोजी सौ. जमुनाबाई बगडिया चॅरिटेबल ट्रस्ट व रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्यावतीने सामाजिक जाणीवेतून सायंकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंतआयोजित करण्यात आलेल्या शिबिरात ४३६ भाविकांच्या मधुमेह चाचण्या




करण्यात आल्या. यामध्ये १६ जणांना मधुमेह असल्याचे निदान झाले, तर ४६ जण प्री-डायबेटिक असल्याचे आढळले.

या तपासणी उपक्रमाचे उद्घाटन बगडिया ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी रेनबोचे प्रकल्प प्रमुख तथा रुबी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राजेश सेठिया, रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा मधुलता भक्कड, सचिव डॉ. अतुल (पान २ वर)

## वहदत-ए-इस्लामी हिंदतर्फे १६ ते २६ ऑगस्ट २०२६ दरम्यान देशव्यापी ‘पैगाम रहमत-ए-आलम मोहिमेची घोषणा

*आत्महत्या, स्त्री भ्रूणहत्या, अमली पदार्थांचे व्यसन आणि पर्यावरणीय प्रदूषणाबाबत पैगंबर मुहम्मद यांच्या शिकवणींच्या जनजागृतीसाठी मोहीम*

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

वहदत-ए-इस्लामी हिंदतर्फे १६ ते २६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत ‘‘रहमत-ए-आलम (स.अ.)’’ या शीर्षकाखाली देशव्यापी मोहीम आयोजित करण्यात येत आहे. ‘‘मानवाला स्वतःच्या हातून मरू देऊ नका’’ हा या मोहिमेचा केंद्रीय विषय आहे. आत्महत्या, स्त्री भ्रूणहत्या, अमली पदार्थांचे व्यसन आणि वायू प्रदूषण या




चार प्रमुख समकालीन आव्हानांबाबत जनजागृती निर्माण करणे आणि सकारात्मक व विधायक कृतीसाठी समाजाला प्रोत्साहित करणे, हा या मोहिमेचा उद्देश आहे.

पत्रकार परिषदेला संबोधित करताना मुहम्मद झियाउद्दीन सिद्दिकी, अमीर (राष्ट्रीय अध्यक्ष), वहदत-ए-इस्लामी हिंद; डॉ. अनीस, राष्ट्रीय सचिव (लखनौ); आणि साजिद सहराई, मोहीम संयोजक यांनी वाढत्या सामाजिक आणि मानवी समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित केली.

मोहिमेच्या आयोजकांनी सांगितले की, आज संपूर्ण मानवजात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर गंभीर आव्हानांना सामोरे जात आहे. भारतालाही विविध सामाजिक आणि नैतिक समस्यांच्या दुष्परिणामांना सामोरे जावे लागत आहे. वहदत-ए-इस्लामी हिंदच्या मते, अल्लाहचे पैगंबर हजरत मुहम्मद मुस्तफा ( ) यांच्या शिकवणी आणि त्यांच्या आदर्श जीवनपद्धतीत या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तसेच नैतिकता, जबाबदारी, करुणा आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारित (पान २ वर)

# १२ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय युवा दिवस

आज देशातील युवा पिढीपूढे(जेन-झी)अनेक आव्हाने उभे आहेत देशातील पेपर फुटी,अन्नपदार्थांमध्ये भेसळ, भ्रष्टाचार, महागडे शिक्षण, बेरोजगारी,महागाई, पर्यावरण इत्यादीसह अनेक कठीणायीचा सामना आजच्या युवा वर्गाला करावा लागणार आहे.जगामध्ये युवा पिढीच्या वाढत्या समस्या पहाता जेन-झीने आक्रमक रूप धारण केले आहे आणि याचे देशासह संपूर्ण जगात आपल्याला पडसाद पहायला मिळत आहे. सध्याच्या परिस्थितीत जगातील संपूर्ण युवकांनी घातक क्षेपणास्त्रे,जैविक हतीयार, प्लास्टिकचा अती वापर, युद्धजन्य परिस्थिती,वाढते धुम्रपान व वाढते प्रदुषण याचा कडाडून विरोध करण्याची वेळ आली आहे.संयुक्त राष्ट्र संघाने १७ डिसेंबर १९९९ ला युवा विश्व संम्मेलनाच्या कार्यक्रमात ठरविण्यात आले की प्रत्येक वर्षाच्या ''१२ ऑगष्टला'' युवा दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली.याप्रमाने पहिल्यांदाच २००० मध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिवसांची सुरूवात करण्यात आली. २०१८मध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिवसांचा थीम होता ''युवाओं के लिये सुरक्षित स्थान'' आणि २०१९ मध्ये थीम होता ''ट्रांस्फोर्मिंग एज्युकेशन'' परंतु २०२६चा थीम ''पृथ्वी को बचाने का प्रयास''.हा थीम असायला पाहिजे असे माझे मत आहे.कारण वैश्विक महामारी आणि पृथ्वीचा होत असलेला ह्रास याला युवा शक्तीच वाचवु शकते. संपूर्ण जगाची धुरा युवकांच्या हाती आहे.कारण आजच्या परिस्थितीत पृथ्वीतलावर ''जगात युध्दजन्य परीस्थितीत दीसुन येते.आज प्रत्येक देश एकमेकावर वरचढ होण्याचा प्रयत्न करीत आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेले युक्रेन-रशिया युद्ध, अमेरिका-इजरायल-हमास-इरान युद्ध व तैवान-चीन कटुता यात प्रगती तर नाहीच परंतु विनाश अटळ आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शि.जिंपिंग यांनी वुहानमध्ये कोरोणा व्हायरस तयार केला आणि याला संपूर्ण जगात पसरविण्याचे काम सुध्दा चीनने केले.यात लाखोंच्या संख्येने जिवीत हानी सुध्दा झाली व करोडोंच्या संख्येने संक्रमीत झाले होते. अमेरीकेने दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी ६ ऑगस्ट १९४५ साली सकाळी ८ वाजुन १५ मि. हिरोशिमा-नागासाकीवर परमाणु बॉम्ब टाकला होता याचे मुख्य कारण तानाशहा हिटलर यांची क्रूरता समाप्त करने होती.परंतु याचे प्रायचीत्य संपूर्ण जापानला भोगावे लागले.यात लाखोंची जीवीत हानीसुध्दा झाली.दिनांक ६ ऑगस्ट या घटनेला ८१ वर्षे पूर्ण झाली. परंतु चीनच्या विस्तारवादी नितीला रोखण्यासाठी अमेरीकेसह नाटोसेनेने चायना सी मध्ये चिनला घेरून ठेवले आहे.सोबतच चीन तैवानला नेहमीच युध्दासाठी उकसवीण्याचे काम करीत असतो. परंतु आता जर युद्ध झाले तर ''तिसरे महायुध्द''अटळ आहे.कारण सध्याच्या परिस्थितीत रशिया-युक्रेन, अमेरीका- नाटो-चीन,इजरायल-हमास-इराण एकमेकांचे कट्टर शत्रू झाले असून सर्वत्र युद्धजन्य परिस्थिती आहे.कोण केव्हा कोणावर महाविणाशक प्रहार करेल हे सांगता येत नाही व यामुळे अनर्थ केव्हाही उद्भवू शकतो याला नाकारता येत नाही.याला युवावर्गानी कोठेतरी रोखले पाहिजे. कारण चीनने सुपरपावर बनण्यासाठी संपूर्ण हद्द पार केलेल्या आहेत आणि आता डोनाल्ड ट्रम्प टेरिफच्या माध्यमातून जगातील अनेक देशांवर दबाव टाकुन सुपर पॉवरचे वर्चस्व कायम ठेऊन तानाशाह बनण्याचे स्वप्न पाहत आहे.जगातील कोणत्याही देशाचा युवक असो त्याने पशु-पक्षी व मनुष्य प्राणी यांना कोणत्याही प्रकारची इजा होणार नाही अशा पध्दतीचे कार्य अंगीकारले पाहिजे.याकरीता चीनच्या युवकांनी शि.जिंनपिंग यांच्या विनाशकारी बायोवेपन्सचा कडाडून विरोध करून चांगला धडा शिकवला पाहिजे.आज संपूर्ण जगाची धुरा युवकांच्या हाती आहे. मानवजातीचा पृथ्वीतलावर जन्म जनकल्याणासाठी व विकासासाठी झाला आहे.त्यामुळे आजच्या युवकांनी जगाला कोणत्याही परीस्थितीत विनाशापासुन रोखलेच पाहिजे अन्यथा केव्हाही अनर्थ होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही. जर्मनीचा तानाशहा हिटलर यांची कल्पना ''विस्तारवादाची'' होती.परंतु त्याचे प्रायचित्य ''हिरोशिमा -नागासाकीच्या'' स्वरूपात ''जापानला'' भोगावे लागले. याची पुनरावृत्ती चीन व चीनच्या मित्रराष्ट्रामध्ये होवु शकते याला नाकारता येणार नाही. चीनचे राष्ट्राध्यक्ष शि.जिनपिंग त्याचे विस्तारवादाचे प्रायचीत्य चीनला व त्यांच्या मित्रराष्ट्रांना भोगावे लागेल.त्यामुळे जगातील युवकांनी या युध्दजन्य परीस्थितीला रोखण्यासाठी जागतिक पातळीवर आवाज उठवीण्याची गरज आहे. करोना काळाच्या कठीण प्रसंगात अनेकांची घरे उजाडली, उपासमारी,भुकमरी, बेरोजगारी, महागाई अशा कठीण प्रसंगांना युवकांना व सर्वसामान्यांना तोंड द्यावे लागले होते.आजचा युवावर्ग शारिरीक दृष्ट्या कमजोर असला तरी ''बुध्दीच्या'' बाबतीत तर्बेज आणि ताकदवर आहे.त्यामुळे आज कोणत्याही संकटाला सामोरे जाण्यासाठी बुध्दीचा योग्य वापर करण्याची वेळ युवकांवर आली आहे.कारण युवाशक्ती ''भविष्याची पुंजी'' आहे.याची जोपासना करण्याचे काम अनुभवी पीढीने युवकांना मदत करून केले पाहिजे. आज संपूर्ण जगात निसर्गाचा ह्रास मोठ्या प्रमाणात होत असल्याने मानवजाती व संपूर्ण जीवजंतू भयभीत आहे. त्याचप्रमाणे जगातील प्रत्येक देशांनी आपल्या वर्चस्वासाठी मोठ्या प्रमाणात दारुगोळा, घातक क्षेपणास्त्रे व परमाणु बॉम्ब बनवीले आहे.म्हणजेच आज संपूर्ण पृथ्वी ''बारुदच्या ढीगाऱ्यावर'' बसली आहे. त्यामुळे प्रत्येक देश विनाशाकडे वाटचाल करतांना दिसत आहे.परंतु विध्वंसकारी व विनाशकारी प्रवृत्तीला युवावर्ग रोखु शकते. प्रत्येक देशाच्या युवकांनी शांतीचा मार्ग स्वीकारण्याचे ठाणले तर प्रत्येक देशाचे राष्ट्राध्यक्ष व राजकीय पुढारी युवकांच्या मार्गाला चालना देवु शकते.आपण हिरोशिमा- नागासिकाचा विनाश पहाला, ४ऑगष्ट २०२० ला ''लेबनॉनची राजधानी बेरुत''त्यांची पुनरावृत्ती आपण पहाली हा धमाका हिरोशिमा-नागासिकापेक्षा भयानक असल्याचे सांगण्यात येते, युक्रेन -रशिया युध्दामुळे युक्रेन १०० वर्षे मागे गेला आहे,आज अमेरिका-इराण-इजरायल युद्धामुळे मोठ्या प्रमाणात वित्तीय व जिवित हाणी झाली व ५० वर्षे मागे गेले.पाकिस्तान आतंकवाद्यांनी भरभटला आहे, बांगलादेश हिंसाचाराने जळत आहे,चीन -तैवानमध्ये युध्दाची ठीणगी केव्हाही उडु शकते, इजरायल -हमास-इराण-अमेरिका संघर्ष तिसऱ्या महायुद्धाचे स्वरूप केव्हाही घेवू शकते.म्हणजेच कोणताही दारूगोळा असो त्याचा फक्त एकच मार्ग असतो तो म्हणजे ''विनाश'' यात सर्वच भरडल्या जाते मग तो कितीही मोठा बलाढ्य देश असो. त्यामुळे जागतिक विनाशाला युवकांनी कोठेतरी रोखलेच पाहिजे अन्यथा अनर्थ होवु शकतो याला नाकारता येत नाही. सध्याच्या परीस्थितीत युवा शक्ती ही ''जगासाठी मोठी पुंजी'' आहे. त्यामुळे सर्वांनीच युवकांना सहकार्य करून जी काही जगात विनाशकारी लीला सुरू आहे तीला ताबडतोब रोखण्याची नीतांत गरज आहे.हे कार्य युवकांच्या शक्तीनेच सफल होवु शकते.युवावर्ग सर्वच क्षेत्रात आमूलाग्र प्रगती करीत आहे यात दुमत नाही.परंतु शि.जिनपिंग व उत्तर कोरियाचा तानाशहा कींम्ग जॉन उन सारखे जगाला विनाशाकडे नेत आहे.यांच्यावर नियंत्रण लावने अती आवश्यक आहे. संपूर्ण जगातील युवावर्ग, शिक्षणामध्ये व खेळांमध्ये अग्रेसर आहेत. भारतातील युवावर्ग राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय खेळांमध्ये अग्रगण्य भुमिका बजावुन देशाची मान उंचावून सन्मानजनक स्थितीमध्ये आहे.याचे संपूर्ण श्रेय युवकांना जाते. देशाचा युवा म्हणजे भारताची आन-बाण-शान आहे.आज देशासह जगात अनेक मोठमोठी आव्हाने उभे आहेत त्याचा मुकाबला युवा पिढी (जेन-झी) करू शकते याचे जिवंत उदाहरण भारतासह अनेक देशांत दिसून आले.त्यामुळे आंतराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने युवकांनी देशातील इतर कार्यासोबत वृक्ष लागवडीकडे लक्ष देवून जास्तीत जास्त वृक्ष लागवडीचा संकल्प केला पाहिजे.कारण पृथ्वीला टीकवुन ठेवायचे असेल तर निसर्ग टिकवून ठेवणे आवश्यक आहे.याकरीता वृक्षलागवड सर्वात मोठा रामबाण उपाय आहे.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल.जय हिंद!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

# हत्ती वाचवा, पर्यावरण वाचवा!

१२ ऑगस्ट हा दिवस जगभर जागतिक हत्ती दिन म्हणून साजरा केला जातो. हत्तींच्या संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. जागतिक हत्ती दिनाची अधिकृत सुरुवात १२ ऑगस्ट २०१२ रोजी झाली. आशियाई आणि आफ्रिकन हत्तींसमोरील वाढते धोके, अधिवासाचा ऱ्हास, हस्तिदंतासाठी होणारी अवैध शिकार आणि मानव-हत्ती संघर्ष याकडे जगाचे लक्ष वेधणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे.

हत्ती हा केवळ जंगलातील एक मोठा प्राणी नाही, तर तो जंगलाच्या परिसंस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या हालचालींमुळे जंगलातील वनस्पतींची रचना बदलते, बिया दूरवर पोहोचतात, काही झाडांच्या पुनरुत्पादनाला मदत होते आणि जंगलात नैसर्गिक वाटा निर्माण होतात. त्यामुळे हत्तींचे अस्तित्व हे अनेक वनस्पती आणि इतर वन्यजीवांच्या अस्तित्वाशी जोडलेले आहे.

मात्र आज हत्तींसमोर अनेक गंभीर संकटे उभी आहेत.

हस्तिदंतासाठी होणारी अवैध शिकार, जंगलतोड, अधिवासाचे तुकडीकरण आणि वाढता मानव-हत्ती संघर्ष यामुळे हत्तींच्या संवर्धनाचे आव्हान अधिक गंभीर झाले आहे. जंगलांचे क्षेत्र कमी होत असताना हत्तींचा नैसर्गिक अधिवासही आकुंचन पावत आहे. परिणामी अनेक ठिकाणी हत्ती आणि मानवी वस्त्यांमध्ये संघर्ष निर्माण होतो. हा संघर्ष केवळ वन्यजीवांसाठी नव्हे, तर स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठीही चिंतेचा विषय आहे.

हत्तींच्या पर्यावरणीय भूमिकेबाबत झालेले संशोधनही महत्त्वपूर्ण आहे. मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनानुसार मध्य आफ्रिकेतील जंगलांमध्ये हत्तींच्या हालचालींमुळे झाडांची संख्या व रचना बदलते आणि मोठ्या, अधिक घनतेच्या लाकडाच्या झाडांना वाढण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते.

या प्रक्रियेमुळे जंगलातील जमिनीवरील जैवभार आणि कार्बन साठवणूक वाढण्यास मदत होऊ शकते. संशोधनानुसार वनहत्तींचे पूर्णतः नामशेष होणे मध्य आफ्रिकेतील वर्षावनांच्या जमिनीवरील जैवभारात सुमारे ७ टक्क्यांची घट घडवू शकते. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते हत्तींचे संरक्षण म्हणजे केवळ एका प्राण्याचे संरक्षण नव्हे; ते संपूर्ण जंगलव्यवस्थेचे संरक्षण आहे. हत्तींची संख्या घटली तर त्याचा परिणाम जैवविविधतेवर आणि जंगलाच्या पर्यावरणीय प्रक्रियांवर होऊ शकतो. म्हणूनच हत्तींच्या संरक्षणासाठी केवळ एक दिवस जनजागृती करून चालणार नाही. अवैध शिकार आणि हस्तिदंताच्या बेकायदेशीर व्यापारावर कठोर नियंत्रण आवश्यक आहे. हत्तींचे नैसर्गिक अधिवास सुरक्षित ठेवणे, जंगलांचे संवर्धन करणे आणि मानव-हत्ती संघर्ष कमी करण्यासाठी वैज्ञानिक व स्थानिक पातळीवरील उपाययोजना करणे गरजेचे आहे.

वन्यजीव संरक्षण कायद्यांची प्रभावी अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची आहे. सरकार, वनविभाग, पर्यावरण संस्था आणि स्थानिक नागरिक यांनी एकत्रितपणे काम केले तरच हत्तींचे संवर्धन अधिक प्रभावीपणे होऊ शकते. शाळा-महाविद्यालयांमध्येही वन्यजीव आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती वाढवली पाहिजे.

आज हत्ती वाचवण्याचा प्रश्न केवळ वन्यजीवप्रेमींचा राहिलेला नाही. तो आपल्या पर्यावरणाच्या भवितव्याचा प्रश्न आहे. जंगल वाचले तर जैवविविधता वाचेल आणि जैवविविधता वाचली तर पर्यावरणाचे संतुलन टिकेल. हत्ती वाचवा; जंगल वाचवा! जंगल वाचवा; पर्यावरण वाचवा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# कोतापूर घुमेवाडी स्मशानभूमीच्या रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर; माजी सरपंच विजय सुतार १५ ऑगस्टपासून उपोषणाला.

**राजापूर - प्रतिनिधी**

राजापूर तालुक्यातील कोतापूर घुमेवाडी येथील स्मशानभूमीकडे जाण्यासाठी सुयोग्य रस्ता उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कोतापूरचे माजी सरपंच विजय परशुराम सुतार यांच्यासह काही ग्रामस्थांनी १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजता कोतापूर ग्रामपंचायतीसमोर बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे लेखी निवेदन त्यांनी संबंधित प्रशासनाकडे सादर केले आहे. कोतापूर घुमेवाडी स्मशान भूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची सध्या अत्यंत दुरवस्था झाली असून, घुमेवाडी तसेच सुतारवाडी परिसरातील मृत व्यक्तींवर अनेक वर्षांपासून याच स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जात आहेत. पूर्वी या



ठिकाणी जाण्यासाठी पायवाट उपलब्ध होती. मात्र, काही काळापूर्वी झालेल्या भूस्खलनामुळे ही वाट मोठ्या प्रमाणात खचून गेली. परिणामी मृतदेह स्मशानभूमीपर्यंत नेणे हे ग्रामस्थांसाठी अत्यंत कष्टाचे आणि धोकादायक ठरत आहे. स्मशानभूमी जाण्यासाठी योग्य रस्ता निर्माण व्हावा, यासाठी माजी सरपंच विजय सुतार गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा करत आहेत. याच मागणीसाठी त्यांनी २५ मे २०२६ रोजी सरपंच, ग्रामपंचायत कोतापूर यांच्याशी लेखी पत्रव्यवहारही केला होता. मात्र, ज्या जागेतून रस्ता जाणार आहे त्या जागामालकांची संमती घेऊन येण्याचे ग्रामपंचायतीकडून त्यांना सांगण्यात आले.

मात्र, हा रस्ता ग्रामपंचायतीच्या अखत्यारीतील विषय असल्याने संबंधित जागामालकांशी ग्रामपंचायतीनेच चर्चा करून पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे सुतार यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. त्यासाठी जागामालकांची स्वतंत्र भेट घेणे किंवा ग्रामसभेची विशेष बैठक आयोजित करून घुमेवाडी व सुतारवाडीतील ग्रामस्थांच्या उपस्थितीत या विषयावर निर्णय घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. स्वतः वैयक्तिकरित्या जागामालकांकडे जाऊन संमतीपत्र मागणे योग्य नसल्याचेही त्यांनी ग्रामपंचायतीला यापूर्वी कळविले आहे.

विजय सुतार यांनी कोतापूर ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून पाच वर्षे काम केले आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजाचा अनुभव असतानाही सध्याच्या प्रशासनाकडून आपल्याला अत्यंत वाईट अनुभव येत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी घुमेवाडीतील एका व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर अंत्यविधीसाठी मृतदेह स्मशानभूमीकडे नेताना ग्रामस्थांना अत्यंत गंभीर परिस्थितीचा सामना करावा लागल्याची घटना त्यांनी निवेदनात नमूद केली आहे.

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या गाड्यांच्या देखभालीकडे दुर्लक्ष



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या गाड्यांच्या देखभालीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. कोकणातील मुंबईहून सुटणाऱ्या गाड्यां किमान १४ - १५ तास प्रवाशांना घेऊन त्यांच्या इच्छीत स्थळी पोहोचवतात.प्रवाशी जेव्हा गाडीतील आपल्या आरक्षित आसनावर बसतो तेव्हा त्याला गाडीची साफसफाई झाली नसल्याचे आढळून येते.खिडकीच्या काचा उघड - बंद होत नाहीत.पान, गुटखा खाऊन पीक आसनाच्या खाली मारलेली असते.गाडीचे नाम फलक अस्पष्ट रुपात आहेत.राजापूर - बोरिवली सायंकाळी ४.३० वाजता सुटणारी गाडीच्या खिडक्यांच्या काचा नादुरुस्त आहेत.जेष्ठ नागरिक एस टी महामंडळाच्या गाड्यांमधून प्रवास करणे पसंत करतात.साधारण दिड दोन तासांनी गाडी पुढील आगारात थांबते तेव्हा लघवीला जाणे सोयीचे होते.शासकीय वाहन असल्याने निर्धास्त प्रवास होतो हा विश्वास आहे.एस टी प्रवाशांनी महामंडळाच्या बस गाड्यांकडे पाठ का? फिरवली याचे महामंडळाच्या परिवहन मंत्र्यांनी, अध्यक्षांनी , प्रशासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे.यंदा कोकणातील गणेशोत्सव कालावधीत ५२२० गाड्या प्रवाशांच्या सेवेसाठी सोडणार असल्याचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी जाहीर केले आहे.त्यांना प्रवाशांच्या वतीने विनंती आहे की, आगारातील उपहारगृहातील स्वच्छता, खाद्य पदार्थांचा दर्जा यांच्या बाबतीत दखल घेऊन योग्य त्या उपाययोजना कराव्यात,मूतारी-शौचालये स्वच्छ कशी ठेवता येतील ते पाहावे.किमान पाच लाखांहून अधिक प्रवाशी मुंबई - पुणे आणि अन्य शहरातून कोकणातील गणेशोत्सवाला येतात.याच कालावधीत एस टी ची आर्थिक उलाढाल प्रत्येक आगाराची लाखो रुपयांची होते.परिवहन मंत्री महोदयांनी कोकणातील आगारातील गैरसोयी दूर करण्यासाठी पुढाकार घ्यावा. राजापूर आगारातून मुंबई कडे जाणाऱ्या एस टी सुस्थितीत धावतील असे पाहावे.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**

# अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी यांना पीएच.डी. पदवी प्रदान

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून 'लघुउद्योगांमधील नेतृत्वशैली व संघटनात्मक कामगिरी' विषयावर संशोधन

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्याचे अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी यांना Doctor of Philosophy (Ph.D.)ही मानाची शैक्षणिक पदवी प्रदान करण्यात आली आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामध्ये त्यांनी "A Study of Effects of Leadership Style on Organizational Performance in Small Scale Industries of Vidarbha" या विषयावर संशोधन करून शोधप्रबंध सादर केला होता. विद्यापीठाने त्यांचा शोधप्रबंध स्वीकारल्यानंतर त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. पोलीस दलातील जबाबदारीचे पद सांभाळत असताना व्यवस्थापन आणि नेतृत्वशैलीसारख्या विषयावर संशोधन करून शैक्षणिक क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल डॉ. साळी यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



नेतृत्वशैलीचा संघटनात्मक कामगिरीवर होणारा परिणाम अभ्यासला

डॉ. विक्रम साळी यांनी आपल्या संशोधनासाठी विदर्भातील लघुउद्योगांमधील नेतृत्वशैली आणि त्याचा संघटनात्मक कामगिरीवर होणारा परिणाम या विषयाची निवड केली. लघुउद्योगांच्या कार्यक्षमतेमध्ये नेतृत्वाची भूमिका, व्यवस्थापनाची कार्यपद्धती, कर्मचाऱ्यांशी असलेले संबंध, निर्णयप्रक्रिया तसेच नेतृत्वाच्या विविध पद्धतींचा संस्थेच्या एकूण कामगिरीवर होणारा परिणाम या व्यापक विषयाच्या अनुषंगाने त्यांनी संशोधन केले.

या विषयावरील त्यांचा शोधप्रबंध संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात सादर करण्यात आला. विद्यापीठाच्या निर्धारित प्रक्रियेनंतर शोधप्रबंधाचा स्वीकार करण्यात आला आणि त्यांना Doctor of Philosophy (Ph.D.) पदवी बहाल करण्यात आली.

**पोलीस सेवेसोबत उच्च शिक्षणाची जिद्द**

पोलीस दलातील अत्यंत जबाबदारीचे पद सांभाळताना उच्च शिक्षणासाठी वेळ देणे आणि संशोधन पूर्ण करणे हे आव्हानात्मक मानले जाते. मात्र, डॉ. विक्रम साळी यांनी शासकीय सेवेसोबतच शैक्षणिक क्षेत्रातही आपली वाटचाल सुरू ठेवत पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांच्या या शैक्षणिक कामगिरीमुळे पोलीस सेवेत कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठीही उच्च शिक्षण आणि संशोधनाची प्रेरणा मिळू शकते, अशी भावना व्यक्त होत आहे.

**पोलीस अधिकाऱ्यांकडून अभिनंदन**

डॉ. विक्रम साळी यांना पीएच.डी. पदवी मिळाल्याबद्दल जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी त्यांचे अभिनंदन केले.

तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे, सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्यासह जिल्ह्यातील विविध पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी डॉ. साळी यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व प्रशासकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पोलीस दलासह पत्रकारांकडूनही शुभेच्छांचा वर्षाव

डॉ. साळी यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल जालना जिल्ह्यातील पत्रकार बांधव, वाचक शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनीही त्यांचे अभिनंदन केले आहे.

पोलीस सेवेत कार्यरत असताना सामाजिक आणि प्रशासकीय विषयांबरोबरच संशोधनाच्या माध्यमातून ज्ञानाच्या क्षेत्रात योगदान देणाऱ्या अधिकाऱ्याच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

संशोधनातून प्रशासनाला दिशा देण्याची संधी

आजच्या काळात कोणत्याही संस्थेची कार्यक्षमता केवळ मनुष्यबळ किंवा उपलब्ध साधनसामग्रीवर अवलंबून नसून योग्य नेतृत्व, निर्णयक्षमता, व्यवस्थापन कौशल्य आणि कर्मचाऱ्यांशी प्रभावी संवाद यांचाही त्यावर मोठा परिणाम होत असतो. त्यामुळे डॉ. साळी यांनी निवडलेला संशोधन विषय व्यवस्थापन आणि संघटनात्मक कार्यक्षमतेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

पोलीस प्रशासनातही नेतृत्व, टीमवर्क, निर्णयक्षमता आणि मनुष्यबळाचे योग्य व्यवस्थापन या बाबींना विशेष महत्त्व असते. त्यामुळे त्यांच्या संशोधनाचा अनुभव त्यांच्या प्रशासकीय कार्यातही उपयुक्त ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

पोलीस अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळतानाच शैक्षणिक क्षेत्रात पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल डॉ. विक्रम साळी यांचे जालना जिल्ह्यातून अभिनंदन होत असून, त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.







संत सावता माळी पुण्यतिथी माळी समाजाच्या वतीने साजरी करण्यात आली या निमित्याने आज रोजी काळुंका माता संस्थान येथून मोठी दिंडी काढण्यात आली असून यामध्ये मोठ्या प्रमाणात भक्तगण दिसून येत आहे सर्व माळी समाज परिवार व इतर भक्तगण दिसत आहे ही दिंडीमाळीपुरा विठ्ठल कसबा विठ्ठल मंदिर व गांधी चव्हाण येथे संपन्न झाली. ***छायाचित्र किरण खानापुरे***

## भोकरदन येथील शासकीय मुलींच्या वस्तीगृहात निकृष्ट जेवणामुळे ५-६ विद्यार्थिनींना विषबाधा - मेस ठेका रद्द करा, कंपनीला काळ्या यादीत टाका - बोरशे गुरुजी

**दत्ता देशमुख**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय मुलींचे वस्तीगृह, भोकरदन येथे ... . . या ठेका कंपनीद्वारे पुरविल्या जाणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या जेवणामुळे दि. ०५/०८/२०२६ रोजी ५ ते ६ विद्यार्थिनींना विषबाधा होऊन त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. आम आदमी पार्टी, जालना गेल्या १ वर्षापासून या वस्तीगृहातील निकृष्ट जेवण आणि गैरव्यवस्थापनाबत सातत्याने पाठपुरावा करीत आहे. यापूर्वीही अशा तक्रारी



होऊनही केवळ औपचारिक कारवाई झाल्याने पुन्हा विद्यार्थिनींच्या जीवाशी खेळ सुरू आहे.

**आम आदमी पार्टीच्या प्रमुख मागण्या**

१. वस्तीगृहाचा मेस ठेका तातडीने रद्द करावा.

२.कंपनीला शासकीय कामातून काळ्या यादीत टाकावे.

३. दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी.

४. विषबाधा झालेल्या विद्यार्थिनींना शासकीय उपचारासह प्रत्येकी ₹५०,००० नुकसानभरपाई द्यावी.

५. अन्नधान्य व शिल्लक अन्नाचे सॅम्पल लॅबमध्ये तपासावेत.

६. निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय चौकशी समिती नेमावी.

७. वस्तीगृहात , बायोमेट्रिक व तक्रारपेटी सुरू करावी.

इशारा

दि. २०/०८/२०२६ पर्यंत वरील मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास आम आदमी पार्टी तर्फे पीडित विद्यार्थिनी *(पान २ वर)*

## निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्ट, पाथ्रीकर कॅम्पसच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त २३८ गुणवंत विद्यार्थ्यांचा पदक, सन्मानचिन्ह देऊन गौरव

**बदनापूर -प्रतिनिधी**

निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्ट, पाथ्रीकर कॅम्पसच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व विशेष प्रेरणादायी व्याख्यान उत्साहात पार पडले. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या २३८ गुणवंत विद्यार्थ्यांचा पदक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत. जल्लोष केला.



कार्यक्रमास संस्थापक अध्यक्ष डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर, सचिव डॉ. एम.डी. पाथ्रीकर, अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर, विश्वस्त डॉ. एस. एस. शेख, डॉ. नाजमा खान, डॉ. सोनाली अग्रवाल, डॉ. प्रज्ञा पाथ्रीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार नारायण कुचे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. एस. शेख यांनी केले. संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक वाटचालीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी संस्था सातत्याने विविध उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना आमदार नारायण कुचे यांनी, 'गुणवत्ता ही केवळ परीक्षेतील गुणांपुरती मर्यादित नसून कष्ट, शिस्त आणि संस्कार यातून खरे यश मिळते. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत,' असे आवाहन केले. प्रसिद्ध व्याख्याते भास्कर पेरे पाटील यांनी आपल्या विशेष प्रेरणादायी व्याख्यानातून विद्यार्थ्यांना जीवनातील संघर्ष, जिद्द आणि सकारात्मक विचारांचे महत्त्व पटवून दिले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून *(पान २ वर)*

### कुंचल्यातून उमटणाऱ्या 'श्रीधर रेषा' थांबल्या!

## जालन्याचे ज्येष्ठ चित्रकार श्रीधर अंभोरे यांचे निधन

**जालना - प्रतिनिधी**

आपल्या कुंचल्यातून सामाजिक वास्तव, मानवी संवेदना आणि साहित्यिक आशयाला प्रभावी दृश्यरूप देणारे जालन्याचे ज्येष्ठ आणि प्रख्यात चित्रकार श्रीधर अंभोरे यांचे सोमवारी पहाटे निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने जालना शहरासह महाराष्ट्राच्या कला आणि साहित्य क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. श्रीधर अंभोरे हे केवळ चित्रकार नव्हते, तर आपल्या वैशिष्ट्यपूर्ण रेषांमधून साहित्याला दृश्यभाषा देणारे कलावंत म्हणून त्यांची स्वतंत्र ओळख होती. महाराष्ट्रातील अनेक लेखक, कवी आणि साहित्यिकांच्या पुस्तकांना त्यांनी आपल्या कलात्मक मुखपृष्ठांमधून वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या चित्रांमध्ये केवळ सौंदर्य नव्हे, तर आशय, संवेदना, सामाजिक भान आणि मानवी जीवनाचे विविध पैलू प्रभावीपणे उमटत असत.



**'श्रीधर रेषां'ची स्वतंत्र ओळख**

अंभोरे यांच्या चित्रशैलीतील रेषांना स्वतंत्र ओळख प्राप्त झाली होती. अत्यंत मोजक्या आणि नेमक्या रेषांमधून एखादा विचार, प्रसंग किंवा भावना व्यक्त करण्याची त्यांची हातोटी उल्लेखनीय होती. त्यांच्या कलाकृतींनी जालना तसेच महाराष्ट्रातील साहित्य आणि कला क्षेत्रात आपला ठसा उमटविला. अनेक लेखक-कवींच्या साहित्यकृतींना त्यांच्या मुखपृष्ठांच्या माध्यमातून मिळालेली दृश्य ओळख आजही त्यांच्या कलाप्रवासाची साक्ष देणारी आहे. त्यांच्या निधनामुळे या वैशिष्ट्यपूर्ण कलाशैलीचा एक महत्त्वाचा अध्याय संपल्याची भावना कला-साहित्य क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

**रामतीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार**

श्रीधर अंभोरे यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी जालना शहरातील रामतीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेले लेखक, कवी, चित्रकार, साहित्यिक, मित्रपरिवार आणि चाहत्यांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. अंत्यसंस्कारानंतर झालेल्या शोकसभेत त्यांच्या कला आणि साहित्य क्षेत्रातील योगदानाचा आवर्जून उल्लेख करण्यात आला. रवींद्र इंगळे, सुरेश साबळे, दासू वैद्य, उत्तम अंभोरे, अशोक इंगळे, मनोज पाठक, रवींद्र सातपुते, अशोक कोतवाल, शेषराव धांडे, राजेंद्र राख आणि राजेश ओ. राऊत यांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केले.

**दूरध्वनीवरून शोकसंदेश**

अंभोरे यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्रातील विविध भागांतील साहित्यिक आणि कलावंतांनी दूरध्वनीद्वारे शोक व्यक्त केला. रामदास फुटाणे, श्रीकांत देशमुख, यशवंत मनोहर, सुमती लांडे, सतीश बडवे, दा. गो. काळे, चित्रकार भ. मा. परसावळे आणि धनंजय गोवर्धन आदींचे शोकसंदेश पंडित तडेगावकर यांनी शोकसभेत वाचून दाखविले.

**कला-साहित्य क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती**

शोकसभेस *(पान २ वर)*

## महाराष्ट्रातून पारितोषिक पटकावून जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा!

**दत्ता देशमुख**

अहिल्यानगर येथे पार पडलेल्या 'इतिहास महाराष्ट्राचा २०२६'च्या अंतिम फेरीत आपल्या बालकलावंतांनी अतिशय सुंदर, दम दार आणि कौतुकास्पद सादरीकरण केले. आपल्या सर्वांच्या मेहनतीचे आणि कलागुणांचे आज महाराष्ट्राच्या व्यासपीठावर सुंदर दर्शन घडले.

बालरंगभूमी परिषद, जालना जिल्हा शाखेतर्फे अंतिम फेरीसाठी ३ संघ पाठविण्यात आले होते. त्यापैकी २ संघांनी संपूर्ण महाराष्ट्रातून पारितोषिक पटकावून जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यामध्ये एकल मोठ्या गटात ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी संबोधी



संदीप इंगोले हिने पारितोषिक पटकावले आहे.तर संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जालना यांनी समूह गटात पारितोषिक पटकावले. हे पारितोषिक बाल रंगभूमी मुंबई अध्यक्षा नीलम ताई शिर्के /सामंत प्रख्यात लोक कलावंत डॉ. गणेश चंदनशिवे, दिग्दर्शक अभिनेते दिगंबर नाईक, ज्येष्ठ रंगकर्मी तथा बालनाट्य प्रशिक्षक श्री संजय हळदीकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे.

या यशासाठी तिन्ही संघांतील सर्व बालकलावंत, त्यांचे पालक, शिक्षक, दिग्दर्शक, प्रशिक्षक आणि मार्गदर्शक यांचे मनःपूर्वक अभिनंदन जालना शाखेच्या अध्यक्षा सिने अभिनेत्री वैशाली दाभाडे व कार्याध्यक्ष प्रा.डॉ.सय्यद अमजद उपाध्यक्ष प्राध्यापक डॉ. विनोद जाधव (प्रशासन) उपाध्यक्ष (उपक्रम) श्रीमती अस्मा *(पान २ वर)*

## आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे १२ ऑगस्ट रोजी आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय युवा दिन'' म्हणून १२ ऑगस्ट हा दिवस साजरा केला जातो, यावर्षी युनायटेड संघटनेचे युवा दिना विषयीचे '' , .'' ''वेगवेगळे संदर्भ समान आकांक्षा'' असे घोषवाक्य आहे याचा अर्थ असा की, वेगवेगळ्या परिस्थिती किंवा पार्श्वभूमी असतानाही लोकांच्या मनातल्या इच्छा, स्वप्ने किंवा ध्येय एकसारखीच असतात. १२ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून दरवर्षी आपण साजरा करतो. युवा वर्ग हा अति संवेदनशिल असून युवा पिढीमध्ये एचआयव्ही / एड्स, गुप्तरोग इत्यादी आजाराविषयी जनजागृती होणे गरजेचे आहे. याअनुषंगाने जिल्हास्तरावर दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता रेड रन स्पर्धा व जिल्हास्तरीय रेड रिबन प्रश्न मंजूषा स्पर्धा तर दि. १२ ऑगस्ट, २०२६ रोजी जनजागृतीपर प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि. १२ ते २६ ऑगस्ट २०२६ या कालावधी मध्ये रेड रिबन क्लब स्थापन असलेल्या महाविद्यालयामध्ये प्रभात *(पान २ वर)*

## पी. एम. श्री जिल्हा परिषद उर्दू हायस्कूल, नूतन मंठा येथे शाळा व्यवस्थापन अध्यक्षपदी तौफिक जिलानी कुरेशी यांची बिनविरोध निवड

**मंठा - प्रतिनिधी**

पी. एम. श्री जिल्हा परिषद उर्दू हायस्कूल, नूतन मंठा येथे शाळा व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. पालक, शिक्षक व शिक्षणप्रेमी यांच्या उपस्थितीत समितीची निवड सर्वानुमते व बिनविरोध करण्यात आली.शाळेच्या शैक्षणिक विकासाला चालना देणे, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करणे, शाळेतील भौतिक सुविधा अधिक सक्षम करणे तसेच पालक आणि शाळा यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने शाळा व्यवस्थापन



समितीची स्थापना करण्यात आली.यावेळी अध्यक्षपदी तौफिक जिलानी कुरेशी, तर उपाध्यक्षपदी इम्रान शेरगुल खान पठाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली.शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य :साजेद खान, कदिर खाटिक, अजीम शेख, तौफिक कुरेशी, इलियास शेख, मोबिन बागवान, अमजद तांबोळी, साकिब शेख, कदिर बागवान, आबेद बागवान, अनिस कुरेशी तसेच तौफिक जे. के. कुरेशी शिक्षणप्रेमी सदस्य यांची निवड करण्यात आली.समितीची निवड बिनविरोध झाल्याने उपस्थित पालक व शिक्षकांनी नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सर्व सदस्यांचे अभिनंदन केले. यावेळी नवनिर्वाचित समितीच्या माध्यमातून शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी, आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.शाळा व्यवस्थापन समिती ही शाळा, पालक *(पान २ वर)*

## विभाजन विभीषिका स्मृती दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

आगामी १४ ऑगस्ट रोजी विभाजन विभीषिका स्मृती दिन देशभरात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. भारताच्या फाळणीदरम्यान लाखो नागरिकांना सहन कराव्या लागलेल्या वेदना, विस्थापन आणि संघर्षाच्या आठवणींना उजाळा देत नव्या पिढीला त्या काळातील इतिहासाची जाणीव करून देण्यासाठी जिल्ह्यात ९ ते १७ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत 'घराघरी तिरंगा' (हर घर तिरंगा) मोहिमे अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने जिल्ह्यात शालेय-महाविद्यालयीन स्तरावर परिसंवाद, चर्चासत्राचे, व प्रश्नमंजूषाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच वंदे मातरम या गितास १५० वर्ष पुर्ण झाल्यानिमित्ताने केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे. देशभक्तीवर गीतांचा कार्यक्रम, घरोघरी तिरंगा अभियान तसेच वंदे मातरम या गीतास १५० पुर्ण झाल्यानिमित्त प्रदर्शन आयोजन करणे, तिरंगा रंगाची रोषणाई, तिरंगा ई-बाईक रॅली, तिरंगा रॅली, सेल्फी विथ तिरंगा रांगोळी *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.